Internal circulation
Theme for the upcoming annual meet.

Date - unknown
probably - 1975

युवक क्रांती दल - महाराष्ट्र

साथी ------------

आपल्या युवक क्रांती दलाच्या वार्षिक शिबीरामध्ये ज्या प्रमुख विषयांवर चर्चा होणार आहे त्या विषयांचे मुद्दे आपणासमोर ठेवत आहोत. प्रत्येक कार्यकर्त्याने आपले अनुभव - वाचन या आधारे सखोल चर्चा करावी. पुढच्या वाटचालीस यातूनच आत्मविश्वास व डोळस दृष्टी लाभेल असा विश्वास आम्हाला आहे.

राजकीय परिस्थिती आणि पक्षबाह्य संघटनांचे स्थान

आणीबाणीपूर्व व आणीबाणीतील आर्थिक, सामाजिक परिस्थिती - सत्ताधारी वर्गांतर्गत असलेल्या संघर्षाचे स्वरुप - चलनवाढ, महागाई, बेकारी, आर्थिक व औद्योगिक मंदी, सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार, शिक्षण क्षेत्रातील अनागोंदी, कामगारविरोधी धोरणे व कायदे, कुटुंब नियोजन कार्यालयातील अतिरेक व अत्याचार २० कलमी कार्यक्रमांचा बोजवारा, आर्थिक व सामाजिकदृष्टया मागास आणि अल्पसंख्यांकावरील हल्ले, राजकीय अस्थिरता, लोकांच्या असंतोषाला उधाण राष्ट्रव्यापी रेल्वे संप, जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील चळवळ.

जनता पक्षाचा काळ :- आणीबाणीविरोधी चार पक्ष एकत्र येऊन पक्ष स्थापना, त्यांचे वर्गीय स्वरूप, अंतर्गत विसंवाद व तणाव, प्रभावी नेतृत्व आणि पक्षशिस्तीचा अभाव, जनता पक्षाचे आर्थिक धोरण व काँग्रेसचे आर्थिक धोरणातील फरक रा. स्व. संघाचा निर्णयप्रक्रियेत हस्तक्षेप व प्रभाव, दोन निष्ठांच्या प्रश्नांवर पक्षात फूट, मंडळ आयोगाची स्थापना.

चरणसिंगांची अल्पकाळ राजवट :- मध्यम जातीचे राजकारण करण्याचा सिध्दांत, ग्रामीण सधन शेतकऱ्यांना झुकते माप दिल्याचा दावा.

इंदिरा गांधींचे पुनरागमन :- मध्यावधी लोकसभा निवडणुकामध्ये इं. कॉं. ला प्रचंड यश. नविन अननुभवी नेतृत्वावर भिस्त, संजय गांधीचा युवक काँग्रेस उभारण्याचा प्रयत्न, प्रांतिक प्रश्नांनी उचल घेतली. [आसाम, पंजाब, मणिपूर, नागालँड] प्रांतिक चळवळी, केंद्र-राज्य संबंधाच्या पुनर्विचाराची मागणी. [सरकारिया आयोग]. विरोधी व प्रांतिक पक्ष सरकारांचा जोर.

प्रांतिक प्रश्नांवरील उठाव :- पंजाबातील अकाली दल नेतृत्वाखालील चळवळ, राज्याला अधिक अधिकाराची मागणी, पाणी, वीज, करसंकलन, कर्जउभारणी इ. धार्मिक मागण्या, धर्म भावनेला आवाहन. इं. कॉं. च्या फोडा व झोडा नितीचा परिणाम, भिंद्रनवालेल्या अतिरेकी धर्मवादी नेतृत्वाचा उदय, हिंदु-शीख धार्मिक तणाव, खलिस्तानच्या मागणीला जोर, अतिरेक्यांच्या हाती चळवळी सूत्रे, सरकारची लष्करी कारवाई, इंदिरा गांधी अट्टाग्रही वृत्तीमुळे तडजोड अशक्य, इंदिरा गांधीची हत्या शीख जनतेवर हल्ले. --- आसामधील परकीय नागरिकत्वाच्या प्रश्नावरील चळवळ, विषम आर्थिक विकास व प्रादेशिक असमतोल, आसामी भाषा व संस्कृती धोक्यामध्ये असे आवाहन लोकेच्छा डावलून आसाममध्ये मध्यावर्ती निवडणुका -- मणिपूर व नागालँडमधील आदिवासींना आपले शोषण भारत सरकारने केले -- आमच्या विकासाकडे दुर्लक्ष

...२/-

केल्याची भावना -- आंध्रप्रदेशातील एन्. टी. रामाराव, सरकार कारस्थान करून खाली खेचण्यास अपयश -- काश्मिरमधील नॅशनल कॉंग्रेस पक्षात फूट पाडून अल्प मताच्या गटाला सत्तेवर आणण्यात इंदिराकॉंग्रेसला यश-हिंदू मुस्लीम संघर्षाचा फायदा करून घेण्याचे धोरण -- अनेक राज्यातील मंत्रीमंडळे कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावर भ्रष्टाचार, कॉंग्रेसमधील गटबाजी यामुळे वारंवार बदलली -- राजीव गांधी युवक कॉंग्रेसमधील नेतृत्वाचा उदय. गुजरातमधील राखीव जागा विरोधी चळवळ, हिंदूत्व वादी व जातीय वादी शक्तींचा वाढता प्रभाव.

आर्थिक परिस्थिती :- एका बाजूला कमालीची राजकीय अस्थिरता व आर्थिक आघाडीवर देशाची कोंडी -- ५००० कोटी रूपयाचे आंतरराष्ट्रीय नाणे निधी कर्ज वादग्रस्त बनले -- अर्थव्यवस्था सावरण्यासाठी परकिय भांडवलाची मदत- मक्तेदार व बहुराष्ट्रीय कंपन्याना देशात गुंतवणूक वाढवण्यास प्रोत्साहन देण्याच्या धोरणाची सुरुवात -- चलनवाढ चालूच.

राजीव गांधीच्या हाती देशाची सुत्रे :- इंदिरा गांधीनंतर राजीव गांधींची पक्षाध्यक्ष व पंतप्रधानपदी नियुक्ती -- अलिप्त राष्ट्र संघटनेचे अध्यक्षपदाचा प्रतिमा निर्मितीस उपयोग-- पंजाब, आसाम प्रश्नावर तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न - नियोजित संसदीय निवडणुकीमध्ये अपूर्व यश -- इंदिरा हत्येचीसहानुभूती --- प्रांतिक नेतृत्वाला मान्यता देण्याचे व केंद्र सत्ता आपल्या हाती सुरक्षित करण्याचे धोरण. राजीव गांधी आधुनिकतेचे प्रतिक -- खुली व मुक्त अर्थव्यवस्था - नविन अत्याधुनिक तंत्रज्ञानाची व उपकरणांची आयात -- सनातन भारतीय संस्कृती व मुल्यांचे जतन करण्याचे फसवे आवाहन, बडया भांडवलदारांना सवलती व आयात निर्यात धोरणात सवलती, संपबंदी कायदा इ. भांडवलदारी विकासाला पूरक धोरणे, राष्ट्रीकृत उद्योग खाजगी उद्योगांना देण्याचा प्रयत्न, शेतीच्या क्षेत्रात विस्तारापेक्षा भांडवलीकरणावर भर, अधिक उत्पादकता हेच एकमेव उद्दीष्ट, वस्त्रोद्योग धोरण, कापूस पिकविणारे शेतकरी, सुती गिरणी मालक व कामदार यांच्या हिताला बाधकता, कृत्रीम धाग्यांची आयात.

महाराष्ट्रातील सत्ता कारण व आर्थिक सामाजिक संबंध

मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर अशा मोठया शहरातून कारखानदारीचा विकास, जिल्हास्तरावर औद्योगिक वसाहतीपूरक उद्योग -- शेतीवर अवलंबून सहकारी व खाजगी उद्योग या क्रमाने कारखानदारीच्या विकासाची दिशा -- बडया उद्योगांच्या स्पर्धेमध्ये कारागिरांचे धंदे नष्ट वाढत्या तंत्रज्ञान व आर्थिक मंदिमुळे बेकारीत वाढ -- रोजगार निर्मितीस मर्यादा -- शेति क्षेत्रातही प्रादेशिक असमतोल विकास -- मर्यादित सिंचन क्षेत्रे -- कोरडवाहू व दुष्काळी भागाचा बिकट प्रश्न - आर्थिक मागास जातीजमातींचा मोठा असंतोष -- स्थलांतरित मजूरी व जंगल गायरान जमिनीवरील अतिक्रमणे. कष्टकरी वर्ग व दलित जातीमधील अंतर्गत संघर्ष, सत्तास्पर्धा सामाजिक-सांस्कृतिक : दृष्टीकोन, -- दलित आदिवासी, भटक्या विमुक्त जाती जमाती, लहान मध्यम शेतकरी, भूमिहिन शेतमजुर, कामगार, स्त्रिया यांच्या चळवळी स्वतंत्रपणे चालू असून त्या एकत्र येऊ शकत नाहीत. महाराष्ट्रातील काही महत्त्वाचे लढे -- नामांतर आंदोलन -मंडळआयोग अंमलबजावणीचा लढा--गिरणी कामगारांचा संप-- शेतमजूरांची आंदोलने, जंगल, गायरान व

पडीक जमिनीवरील आदिवासी, दलित, भटक्या विमुक्त जाती यांचे आंदोलन -- शरद जोशी च्या नेतृत्वाखालील चळवळ-- स्त्रियांच्या चळवळी, धरणग्रस्तांच्या प्रश्नावर सत्याग्रह--दत्ता सामंत --- जॉर्ज फर्नांडिस -- शरद जोशी यांच्या एकजूटीचे संभाव्य आंदोलन.

आंतरराष्ट्रीय राजकारण :- साम्यवादी व भांडवलदारीचे यांच्यातील संघर्षाचे स्वरूप-- नव-स्वतंत्र अलिप्त राष्ट्र व त्यांचे राजकारण, अविकसित देशांची आर्थिक समस्या, भांडवली विकासासाठी बड्या राष्ट्रांवर अवलंबून I -- दक्षिण आफ्रिका, निकारागुआ, चिली, अफगाणिस्तान, इराण, इराक युध्द , पॅलेस्टाईन मुक्ती संघर्ष पाकीस्तान, सिलोन यांचे भारताशी संबंध -- दबाव गटाचे राजकारण -- अण्वस्त्रांचा धोका.

राजकीय पक्षबाहय संघटनांचे स्थान :- राजकीय पक्षांचा प्रतिकात्म सहभाग-- मोठी राजकीय चळवळ व प्रभाव नाही -- संसदीय आघाडीवर लक्ष केंद्रीत -- परस्पर विसंवाद व स्पर्धात्मक संबंध -- चळवळी व संघटन उभारण्यातील सातत्याचा अभाव -- केवळ संसदीय पातळीवर परस्पर सहकार्य -- पक्ष बाहय संघटनांचे विविध सामाजिक स्तरामध्ये कार्य अशा गटांचा व्यापक राजकिय परिणाम कमी -- काही तात्त्विक व्यवहारिक प्रश्न -- परस्पर सहकार्य व एकजूटीच्या प्रयत्नाला मर्यादा.

---

## संघटात्मक विश्लेषण

विशेषत: युक्रांदच्या फुटीच्या वेळी संभ्रमाचे वातावरण तयार केले असता शिवाय बाहय परिस्थितीमधील आव्हाने अनेक असतांना आपण काही गोष्टी निश्चित स्वरूपात केल्या आहेत. याबरोबरच काही प्रश्न सुध्दा तयार झाले आहेत. पुढील वाटचालीत त्यावरील उपाय शोधून काढण्याची आवश्यकता वाटते. म्हणून परखड मूल्यमापन करण्याची गरज भासत आहे. खालील मुद्दयांच्या आधारे व याव्यतिरिक्तही नवीन मुद्दे मांडून विचार विनिमय करण्यात यावा असेच कार्यकारिणीला वाटत आहे.

१] तत्वज्ञान-भूमिकेचा विकास :- मूलभूत भूमिकेचा विश्लेषण - तिचा विकास -- कार्यकर्त्यांची प्रशिक्षण शिबिर व साहित्य -- कार्यकर्त्यांची गुणात्मक वाढ -- सद्य राजकीय/सामाजिक/आर्थिक परिस्थितीवरील भूमिका--संबंधित व्यवहार व कार्यक्रम.

२] संघटनेची बांधणी व रचना : - औपचारिक -अनौपचारिक व्यवहारातून विकसित झालेले कार्यकर्त्यांमधील परस्पर संबंध -- जबाबदारी व शिस्त -- कार्यकारिणीने घेतलेले निर्णय व अंमलबजावणी -- कार्यकारिणीचे केंद्राशी व कार्यकर्त्यांशी असलेले संबंध -- निर्णयप्रक्रिया -- त्यातील कार्यकर्त्यांचा सहभाग -- कामाचे स्वरूप आणि वाटप संघटनेच्या राजकीय संघटना व जनसंघटनामधील कार्यकर्त्यांचे प्रश्न व संबंध -- जनसंघटनांची स्वतंत्र निर्णय प्रक्रिया -- त्यांची स्वतंत्र प्रेरणा -- संघटनेच्या बांधणी व रचनेविषयीच्या नवीन संकल्पना

...४/-

३] कार्यक्रम :- कार्यक्रमांचे स्वरूप -- राजकीय कार्यक्रमांवरील भर -- भूमिकेशी सुसंगत कार्यक्रम-- प्रयोगात्मक कार्यक्रम व स्थिर स्वरूपाच्या बांधणीतील कार्यक्रम -- संघटनेच्या शक्तिमर्यादेत वा शक्तिबाहेरील कार्यक्रम-कार्यकर्त्यांचा सहभाग -- कार्यक्षेत्राची व्याप्ती व त्यातून संघटनात्मक भर -- निवडणुकांच्यावेळी डाव्या आघाडीला दिलेला पाठींबा त्यातून झालेली संघटनेचीप्रतिमा.

४] आर्थिक :- निधी जमविण्याची यंत्रणा -- कार्यकर्त्यांकडून मिळणारी लेव्ही -- कार्यकर्त्यां- तर्फे जमविण्यात येणारा निधी -- प्रासंगिक [घोषणा विशेषांक] जमणारा निधी -- जनसंघ- टनांमार्फत वर्गणी स्वरूपातील निधी -- त्यातील मर्यादा -- पूर्णवेळ कार्यकर्त्यांचे मानधन व त्याची यंत्रणा--विशिष्ठ कार्यक्रमांच्यासाठीचा खर्च -- जन संघटनेतील पूर्णवेळ कार्यकर्त्यांच्या मान- धनाविषयी--नविन कामांच्या बांधणीसाठीचा खर्च.

५] घोषणा :- घोषणाचे स्वरूप -- युक्रांदचे मुखपत्र म्हणून बजावलेली भूमिका -- वर्गणीदार करण्याविषयीचे प्रयत्न -- आर्थीक यंत्रणा-त्यातील कार्यकर्त्यांचा सहभाग.

६] मित्र संघटनांशी असलेले संबंध :- जन संघटनांबरोबरील कार्यक्रम -- त्यातील आपल्या भूमिकेचा आग्रह -- राजकीय संघटनाबरोबरील संवाद-- राजकीय व जनसंघटनांबरोबरील निर्माण झालेली विश्वासार्हता.

## मित्र संघटनांबरोबरील संवाद

गेल्या दोन/तीन महिन्यांपासून मित्र संघटनांबरोबर संवाद साधण्याचा प्रयत्न चालू आहे. सद्य राजकीय परिस्थितीत संसदबाहय संघटना सातत्याने क्रियाशील असतांना त्यांच्या कृतितून राजकीय परिणामकारकता फारसी जाणवत नाही. कळत/नकळत संकुचितवादी राजकारण व विभागीय कृति या संघटनांतर्फे होताना जाणवते. त्यामुळे आपआपल्या संघटनांचे अस्तित्व कायम ठेवून राजकीय परिणाम साधण्यासाठी कोणत्या कार्यक्रमावर एकत्र येता येईल याविषयी विचारविनिमय करण्याची आवश्यकता जाणवत आहे. त्यातूनच वैचारिक संवादाची देवाण-घेवाण होण्याची प्रक्रिया सुध्दा सुरु होईल या भावनेतून श्रमिक मुक्ती दल -- सी.आर.सी. व युक्रांदतर्फे दलित पँथर्स -- इन्किलाबी आंदोलन -- व यूसीसीआरआयएम्एल्--युक्रांद-[कार्यवाह] सुभाष लोमटे] -- सत्यशोधक कम्युनिष्ठ पक्ष -- छात्र युवा संघर्ष वाहीनी-- बहुजन संघर्ष -- नौजवान भारत सभा -- चंद्रपुल्ला रेड्डी ग्रुप -- समता आंदोलन -- दलित युवक आघाडी-- श्रमिक संघटना आदी संघटनांना एक निवेदन पाठविले आहे. त्याआधी काही संघटनांबरोबर संवाद झाला आहे. प्रतिसाद चांगला मिळतोय. सर्व एकत्र आल्यावर वेगवेगळया पार्श्वभूमीतून आलेल्या संघटना एकत्रित कार्यक्रम घडविण्यास किती येतील हा प्रश्न पुढील प्रक्रियेवरच अवलंबून आहे. त्यासाठी आपण कसा विचार करणार हे महत्वाचे आहे. खालील मुद्यांव्यतिरिक्तही चर्चा होण्याची आवश्यकता आहे. -------- सद्य राजकीय परिस्थितील भौतिक दडपण वा अपरिहार्य कारणे -- विविध विचारसरणी व व्यवहार -- एकमेकांशी असलेले संघटनात्मक संबंध असाहयतेची भावना-- एकत्र येण्याचा वैचारिक पाया -- राजकीय आघाडीची शक्यता-- राजकीय कार्यक्रमावरील एकजूट -- त्यांचे स्वरूप -- या प्रयत्नांमागील राजकीय महत्व.

कार्यकारिणी युवक क्रांती दल महाराष्ट्र.